****सूचना****

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सरळसेवा भरती प्रक्रिया २०२३-२०२४ अंतर्गत कनिष्ठ लघुलेखक (गट-क) संवर्गाची लेखी परीक्षा IBPS यांचेमार्फत घेण्यात आली होती. सदर लेखी परीक्षेमध्ये किमान ४५% गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत दिनांक १८ जून २०२६ रोजी घेण्यात आली होती. सदर व्यावसायिक कौशल्य चाचणी परीक्षेचा निकाल प्रसिध्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार लेखी परीक्षा व व्यावसायिक कौशल्य चाचणीमधील गुणांच्या आधारे तसेच उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गानुसार सरळसेवेने भरावयाच्या पदांच्या सामाजिक व समांतर आरक्षणानुसार प्रवर्गनिहाय उपलब्ध पदांच्या संख्येच्या व गुणवत्तेच्या आधारे, तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून, सदरबाबत काही आक्षेप असल्यास ७ दिवसांत नोंदविण्यात यावेत. तद्नंतर आलेले आक्षेप ग्राहय धरण्यात येणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सदर तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

**प्रशासकीय अधिकारी**
**महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई**